I.O. प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद शहर **P.S.(ठाणे):** एम.आई.डी.सी. सिडको **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0053 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 16/02/2021 19:52 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार — **Date From (दिनांक पासून):** 24/07/2020

**Time Period (कालावधी):** पहर 6 — **Date To ( दिनांक पर्यंत):** 24/07/2020

**Time From (वेळेपासून):** 16:15 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:35 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 16/02/2021 **Time (वेळ):** 19:52 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 036 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 16/02/2021 19:52 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** प्रोझोन मल समोर, ,हान्फीस मोबाईल सेंटर, , औरंगाबाद

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** मिकाजी अर्जुन यादव

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1975 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | प्लट नं 3,न्यु गणेश नगर,एन-4 सिडको,औरंगाबाद,एम.आई.डी.सी. सिडको,औरंगाबाद शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | प्लट नं 3,न्यु गणेश नगर,एन-4 सिडको,औरंगाबाद,एम.आई.डी.सी. सिडको,औरंगाबाद शहर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उपनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अप्पासाहेब मुरलीधर गोराडे | | | 1. प्लॉट नं ,मयुर पार्क, ,हर्सुल औरंगाबाद, एम.आई.डी.सी. सिडको,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम ख़बर हकीकत ):**

मी खालील सही करणार भिकाजी अर्जुन यादव वय-46 वर्ष,व्यवसाय- प्लर्टींग खरेदी विक्री रा.न्यु गणेश नगर,प्लट नं. 3,एन-4 सिडको, औरंगाबाद.मी दि.23/07/2020 रोजी लाचलुचपत प्रतिबंध विभाग,औरंगाबाद येथे प्रत्यक्ष हजर येवुन तक्रार दिली होती की, मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहत असुन प्लर्टींग खरेदी विक्रीचा व्यवसाय करतो. माझे मावस दाजी श्री.भगवानराव लांडगे हे अतिरिक्त जिल्हाधिकारी या पदावर मुंबई येथुन 31/06/2008 रोजी सेवानिवृत्त झालेले आहे.तेव्हा पासुन ते पुणे येथे स्थायीक झालेले आहे. माझे दाजी श्री.भगवानराव लांडगे व त्यांची मुलगी नामे ड.विजया शरदचंद्र जगताप यांच्या मालकीची जमीन शेत गट नं. 16 मध्ये मौजे चिंचोली येथे 100 आर (1 हेक्टर) कोरडवाहु जमीन आहे.माझे दाजी व त्यांची मुलगी हे बाहेर गावी असल्याने सदर जमीनीची देखभाल करणे करीता त्यांनी मला आम मुख्यत्यार पत्र लिहुन दिलेले आहे ते मी आपणाकडे हजर करीत आहे. माझे मावस दाजी श्री.भगवानराव लांडगे यांचे नावे मौजे चिंचोली ता.जि. औरंगाबाद शेत गट नं.16 मध्ये 80 आर जमीन व त्यांची मुलगी ड.विजया जगताप यांचे नावे 20 आर असलेल्या जमीनीची पाहणी करणे करीता मी व माझे दाजी दि.25/05/2020 रोजी मौजे चिंचोली येथील शेतात गेलो. त्यावेळी मला व माझ्या दाजीला शेतातील मुरुम/दगड (गौणखनीज) खोदुन चोरुन नेल्याचे निर्दशनास आले.त्यानंतर माझ्या दाजीने व मी त्यांचे शेताचे आजुबाजुला गौणखणीज कोणी खोदुन काढले बाबत विचारपुस केली असता आम्हाला दाजीचे शेतजमीनीचे शेजारी असलेले 1)श्रीधर सुर्यभान म्हस्के व 2) श्री.ब्रम्हदेव जनार्दन बोगणे रा.आडगाव (बु||) यांनी गौणखणीज चोरी केले बाबत खात्रीलायक माहीती मिळाली. त्यानंतर आम्ही सदर जमीनीचे व जमीनीत, केलेल्या खदानीचे मोजमाप केले असता त्यामधुन 120 फुट रुंदी व 110 फुट लांबी व 80 फुट उंची असे एकुन 11307.4 ब्रास गौणखणीज चोरी केल्याचे आमच्या निदर्शनास आल्याने त्याबाबतचा लेखी अर्ज मी व माझे दाजी यांनी दि. 01/06/2020 रोजी मा.तहसीलदार व मा.उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, कार्यालय औरंगाबाद यांना दिलेला आहे. त्यानंतर आम्ही मा.जिल्हाधिकारी,जिल्हा गौण खणीकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडे दि.05/06/2020 रोजी माझे दाजीचे शेतातील मुरुम व दगड चोरुन विक्री केल्याबद्दल मोजमाप करुन शासकीय मुल्यांकण ठरविण्याबाबत लेखी अर्ज दिलेला आहे.सदर अर्जाची छायांकीत प्रत मी आपणाकडे हजर करीत आहे. त्यानंतर मा. तहसीलदार,औरंगाबाद यांनी मंडळ अधिकारी,चिकलठाणा तलाठी सजा आडगाव (बुद्रुक) यांना लेखी पत्र देऊन आम्ही दिलेल्या अर्जाचे अनुषंगाने कार्यवाही करुन अहवाल व पंचनामा या कार्यालयात सादर करणे बाबत निर्देश दिलेले होते. त्यावरुन मी श्री.गोराडे,मंडळ अधिकारी यांना फोनवर संपर्क केला असता श्री.गोराडे मंडळ अधिकारी हे मला म्हणाले की, मी तुमच्या दाजीच्या शेतातील खदाणीचा व पिकाचा पंचनामा करुन अहवाल तहसीलदार यांना सादर करतो. त्यासाठी तुम्ही मला व तलाठी श्री. प्रकाश मोरे यांना 50,000/- रुपये दया मी तुमच्या दाजीच्या शेताचा पंचनामा लवकर करुन देऊन अहवाल तहसीलदार यांना सादर करतो असे म्हणाले, त्यावर मी श्री.गोराडे,मंडळ अधिकारी यांना

म्हणालो की साहेब माझेकडे एवढे पैसे नाहीत. माझे दाजी मला एवढे पैसे देणार नाही. त्यावेळी श्री.गोराडे मंडळ अधिकारी हे मला म्हणाले की, तुम्ही जर मला व तलाठी श्री.प्रकाश मोरे यांना 50,000/- रुपये दिले नाही,तर आम्ही पंचनामा करुन अहवाल तहसीलदार यांना सादर करणार नाही.मी जर 50,000/-रुपये श्री.गोराडे,मंडळ अधिकारी व तलाठी श्री.प्रकाश मोरे यांना नाही दिले तर ते माझ्या दाजीच्या शेतीतील खदाणीचा व शेतीचा पंचनामा करुन अहवाल तहसीलदार यांना सादर करणार नाही. त्यामुळे मी त्यांना नाईलाजाने हो म्हणालो. मला श्री.गोराडे मंडळ अधिकारी व तलाठी श्री.प्रकाश मोरे यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी आज रोजी लाचलुचपत प्रतिबंध विभाग, औरंगाबाद येथे त्यांच्या विरुध्द तक्रार देण्यासाठी आलो आहे. श्री.गोराडे मंडळ अधिकारी व तलाठी श्री.प्रकाश मोरे यांचे सोबत माझा उसनवारीचा किंवा देण्या घेण्याचा काही एक व्यवहार नाही. तसेच माझे त्यांचेशी काहीएक वैर-दुष्मनी नाही. मी श्री.गोराडे मंडळ अधिकारी यांना दि.24/07/2020 रोजी भेटण्यासाठी जाणार आहे. त्यावेळी श्री.गोराडे मंडळ अधिकारी व तलाठी श्री.प्रकाश मोरे यांनी माझ्याकडे माझ्या दाजीचे शेतीतील खदाणीचा व पिकाचा पंचनामा करुन त्याचा अहवाल तहसीलदार यांना सादर करण्यासाठी माझेकडे 50,000/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम स्वत:अगर दुसऱ्या मार्फत स्वीकारल्या नंतर त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी हि विनंती आहे. मी माझ्या मावस दाजीचे व त्यांच्या मुलीचे शेताचे सातबारे,मोजणी नकाशा व तहसिलदार औरंगाबाद यांनी मंडळ अधिकारी तलाठी सजा आडगाव बु.यांना दिलेले पत्राची छायांकीत प्रत मी आपणाकडे हजर करीत आहे अशी तक्रार दिलेली होती.सदर तक्रारीवर मी, पंचानी व पोलीस निरिक्षक श्री.गणेश घोक्रट यांनी त्यावर स्वाक्षऱ्या केलेल्या आहे.माझ्या तक्रारीच्या अनुषंगाने पो.नि.श्री.गणेश घोक्रट यांनी दिनांक 24/07/2020 रोजी श्री.गोराडे मंडळ अधिकारी व श्री.प्रकाश मोरे तलाठी यांची लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेतला.त्यानंतर मी पंचासह हान्फीस मोबाईल सेंटर, प्रोझोन मल,औरंगाबाद येथे गेल्यावर मी श्री.गोराडे मंडळ अधिकारी यांना फोन केला असता त्यांनी मला अंकित कलेक्शन,प्रोझोन मल जवळ,औरंगाबाद येथे बोलावल्यावरुन आमची सदर ठिकाणी भेट झाली. त्यावेळी आमच्यामध्ये कामासंबंधाने बोलणे झाले. त्यावेळी श्री.गोराडे मंडळ अधिकारी यांनी माझ्याकडे माझ्या दाजीच्या शेतातील खदाणीचा व पिकाचा पंचनामा करुन अहवाल तहसिलदार यांना सादर करण्यासाठी तलाठी श्री. प्रकाश मोरे यांचेसाठी 25,000/-रुपये व त्यांचे स्वत:साठी 25,000/- रुपये असे एकुण 50,000/-रुपये लाचेची मागणी केली.त्यानंतर दिनांक 03/08/2020 रोजी मी श्री.मोरे तलाठी यांना माझ्या दाजींच्या वरील कामाकरीता माझेकडे व्हाईस रेकर्डर देवुन पंचासह भेटण्यासाठी गेलो असता त्यांनी माझ्या दाजींच्या शेताचा पंचानामा करुन देतो असे म्हणाले व त्यांनी माझ्याकडे कोणत्याही प्रकारच्या लाचेची मागगी केली नाही. त्यानंतर दि. 05/08/2020 रोजी श्री. मोरे तलाठी यांना फोन करून पंचनाम्याबाबत विचारले असता त्यांनी तालुका भूमी अभिलेख अधिकारी यांचेकडुन जमीन मोजनी नकाशा घेवुन या त्यानंतर आपण पंचनामा करू असे कळविले. त्यानंतर मी तालुका भूमी अभिलेख कार्यालयाकडुन नकाशा प्राप्त केल्यानंतर श्री. मोरे तलाठी यांना फोनवर संपर्क केला असता त्यांनी कोवीड ची लागण झाली असल्याचे कळवुन नंतर संपर्क करतो असे सांगितले. त्यानंतरही मी श्री. मोरे, यांना फोनवर संपर्क केला असता त्यांनी तहसिलदार यांचे नाव घेउन त्यांनी मला उडवाउडवीचे उत्तरे देवुन फोन केल्यावर या असे म्हणाले. त्यानंतर दिनांक 02/02/2021 रोजी मी तहसिलदार श्री.लाड यांना माझ्या दार्जीच्या वरील कामाकरीता माझेकडे व्हाईस रेकर्डर देवुन पंचासह भेटण्यासाठी गेलो असता त्यांनी माझ्या दार्जींच्या शेताचा पंचानामा करण्यासाठी तलाठी व मंडळ अधिकारी यांना आदेश काढले असल्याचे सांगुन त्यांनी माझ्याकडे कोणत्याही प्रकारच्या लाचेची मागणी केली नाही. श्री.गोराडे, मंडळ अधिकारी यांची इतरत्र बदली झाल्याने त्यांच्या जागी नवीन मंडळ अधिकारी आल्याचे मला समजले आहे. श्री.गोराडे,मंडळ अधिकारी यांची बदली झाल्याने ते माझेकडुन लाचेची मागणी केलेले 50,000/- रूपये आता स्विकारणार नाही. करीता लोकसेवक श्री. आप्पासाहेब मुरलीधर गोराडे वय 50 वर्षे व्यवसाय-नोकरी, मंडळ अधिकारी, चिकलठाणा,औरंगाबाद रा. प्लट नं- 16,मयुरपार्क,औरंगाबाद यांनी माझ्याकडे दिनांक 24/07/2020 रोजी 16.15 ते 16.35 वाजेच्या दरम्याण हान्फीस मोबाईल सेंटर, प्रोझोन मल समोर, औरंगाबाद येथे माझ्या दाजीच्या शेतातील खदाणीचा व पिकाचा पंचनामा करुन अहवाल तहसिलदार यांना सादर करण्यासाठी तलाठी श्री.प्रकाश मोरे यांचेसाठी 25,000/-रुपये व त्यांचे स्वत:साठी 25,000/- रुपये असे एकुण 50,000/- रुपये पंचासमक्ष लाचेची मागणी केली आहे म्हणुन माझी त्यांचेविरुध्द कायदेशिर फिर्याद आहे. म्हणुन कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनीयम 1988 प्रमाने गुन्हा दाखल करुण पुढील तपासकामी पो. नि- श्री - गणेश घोक्रट नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद यांचेकडे दिले.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Vitthal Subhashrao Pote(I (Inspector)) / PI **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14. Signature/Thumb Impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Yadav

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे-एम.आय.डी.सी
सिडको औरंगाबाद (शहर)

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची

Name (नाव): Vitthal Subhashrao Pote
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): PI

पो उप नि भगवान डी नागरे